“महात्मा ज्योतिबा फुले यांचे इतिहास लेखनातील योगदान : एक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानवविज्ञान विद्याशाखा अंतर्गत
इतिहास या विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

अविनाश गंगाधर मलदोडे

मार्गदर्शक

डॉ. कोंडेकर आर. एस.

प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड
ता. मुदखेड जि. नांदेड

संशोधन केंद्र

पानसरे महाविद्यालय, अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड

सप्टेंबर : २०२२

प्रस्तावना

सामाजिक व शैक्षणिक क्रांतीचे अग्रदुत आणि प्रथा, परंपरा व कर्मकांडाचे कर्दनकाळ महात्मा ज्योतिबा फुले हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे नाही तर भारताचे भाग्यविधाते होते. महाराष्ट्रात समाजाची चिंता करणाऱ्यांची फार मोठी गर्दी होती. परंतु या चिंतेसाठी झगडणारे अगदी नगन्य होते. यामध्ये काही कर्ते सुधारक तर काही बोलके सुधारक यांचा समावेश होता. महात्मा फुले म्हणतात की, मनुने जी धर्मग्रंथ्र रचना केली व जातीव्यवस्था सांगितली ही स्वार्थ प्रेरीत होती. कारण माणसा माणसात भेद निर्माण करण्यासाठी जर या जातीचा जन्म झाला असेल तर ही जात अमान्य आहे. मानवता हाच खरा धर्म मानणारे फुले यांनी आपल्या काव्यामधून याची समाजाला जाणीव करून दिली.

सर्वाचा निर्मिक आहे एक धनी। त्याचे भय मनी। धरा सर्वा।
न्यायाने वस्तुचे उपभोग घ्यावा। आनंद करावा। भांडू नये।
धर्म राज्य भेद मानवा नसावे। सत्याने वर्तावे ईशासाठी।
सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों। आर्यास सांगतो। जोती म्हणे।

उपरोक्त काव्याचे उदाहरण देऊन महात्मा फुले म्हणतात की, ज्याने ही पृथ्वी निर्माण केली आहे ते निर्मिक आहेत. पृथ्वी निर्माण करणारा, प्राणीमात्रास सर्व सुख सुविधा देणारा, स्त्री-पुरूषांमध्ये भेदभाव न मानणारा तसेच ऊन, वारा, पाऊस यांचा समतोल साधणारा करता करवीता एकच निर्मिक आहे. मग ज्याने ही पृथ्वी निर्माण करून सर्वांना समान संधी दिली असेल तर भेदभाव करणारे हे मनुष्य कोण? असा प्रश्न विचारून त्यांनी मनुस्मृतीचे वाभाडे काढले.

निर्मिकाने सर्वांना समान बनवून त्यांना समान बुद्धी दिली. परंतु काही लोकांनी बुद्धिचा योग्य तो वापर केला नाही, यांची खंत महात्मा फुलेना होती. श्रेष्ठ-कनिष्ठ आणि स्पृश्य-अस्पृश्य असा जो काही कृत्रिम भेदभाव निर्माण केला आहे तो त्यांना अमान्य होता. पाप-पुण्य, स्वर्ग-नर्क, पुर्वजन्म-पुर्नरजन्म अशा भाकड कथा निर्माण करून समाजाला भिती घालण्याचे महामाप काही स्वार्थी वृत्ती असणाऱ्या कर्मठ ब्राह्मणांनी केले. महात्मा फुलेनी धर्माचरणाची व पुराण कथेचे विश्लेषण अत्यंत तर्कनिष्ठ आणि विज्ञाननिष्ठ दृष्टीने खालीलप्रमाणे केले.

मानवाचे हक्क सर्वास कळतां। मग कोण त्राता।

विचारिते झाले सर्व कसे निच। आर्य कांरे उंचा। बळीस्थानी।

विषारी ते वेद अज्ञान्या डसती। बिळांत पळती। सर्पावत।

भांडणे लागतां सर्वाचे वाटोळे। पाखंडे सोहळे। फेका दूर।

येणारे अरिष्ट कसे तरी टाळा। शुद्रादीक गळा। चडा आता।

वेळ आली आत्मपरिक्षण करा। निर्मिकास स्मरा। जोती म्हणे।

चूल आणि मूल इतकेच स्त्रीचे कार्यक्षेत्र होते. पुर्वीपासूनच स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा जो दृष्टिकोन होता तो संकूचीत होता. स्त्रीने फक्त चार भिंतीच्या आत राहूनच आपले कार्य करावे. इतर कामामध्ये त्यांनी कोणताही हस्तक्षेप करू नये. किंवा त्यांची बाह्य कामामध्ये हस्तक्षेप करण्याची लायकी नाही असा समज तत्कालीन समाजाचा होता. तसेच स्त्रियांवर बंधने घालणाऱ्या व अन्याय करणाऱ्या बालविवाह, बालजरठ विवाह, बहुपत्नित्व, पुर्नविवाह इत्यादी रूढी प्रथा ब्राह्मणांनी रूढ केल्या व त्या शूद्र पुरूषांनी त्या जशास तशा स्वीकारल्या असे ते म्हणतात. फुले स्त्रियांवर

अन्याय करणाऱ्या शूद्र पुरूषांचेसुद्धा वाभाडे काढतात. स्त्री-पुरूष समानता नाकारणाऱ्या मनुस्मृतीचा समाचार घेताना ते खालील काव्यात म्हणतात की-

भटपेशावा जो नाना। छेडी स्त्रिया लोकरांना।

बहुस्त्रियांचा हा पती। स्त्रीस का उलटी रिती।

एक मरता दाजी जाया। हा मारतो सती न्याया।

पक्षपाती सर्व मनु। नेत्री सलतात कानू।

महात्मा फुले यांच्या ऐतिहासिक ग्रंथसंपदेचा अभ्यास केल्यानंतर एक बाब स्पष्ट होते की, त्यांनी मानवतावादाचा स्वीकार केलेला दिसून येतो. मानव एकच धर्म आहे, एकच जात आहे ती म्हणजे मानव हा मानव आहे. त्याला कोणत्या जातीने, धर्माने पाहून मानवाच्या पुढे वेगवेगळे शिक्के लावण्याचा अधिकार कोनालाही नाही असे ठामपणे सांगतात. याविषयी खालील काव्यात म्हणतात की,

मानवा सारखे निर्मीले। कमी नाही केले। कोणी एक।

कमी जास्ती बुद्धी मानवा वोपली। कोणानाही दिली। पिढी जावा।

शुद्रादीक नाही कशामध्ये उणा। अवयवी खणा। आर्यापरी।

मानवाला निर्मिकाने निर्माण केले असेल तर या निर्मिकाने कोणताही भेदभाव केला नाही कमी जास्त बुद्धी प्रत्येकाला दिली आहे, तर मग अवयवामध्ये कमी मानून त्यांनी शुद्रांना कमी का मानले? मानवाचा हक्क ते का विसरले? अतिशूद्र झाले पशुजशूद्र केव्हा आले आर्याचे दास बाकी अनुदास कसे झाले मानवाचे हक्क ते का विसरलेत व तो अतिशूद्र झालेले आहे. आर्याचे दास बाकी सर्व शूद्र कसे बनले? असे

अनेक प्रश्न महात्मा फुले यांनी उपस्थित करून कर्मठ ब्राह्मणी लेखनाचा धिकार केला आहे.

संशोधन समस्या

वैज्ञानिक संशोधनात समस्या निर्धारण किंवा समस्यासूत्रण ही सामाजिक संशोधनाची प्रथम पायरी होय. सामाजिक समस्या अतिशय जटिल स्वरुपाच्या असतात. कारण समस्यांना अनेक पैलू असतात. त्यापैकी कोणत्या तरी एका पैलूची निवड संशोधन अध्यनासाठी करावी लागते. अशा प्रकारच्या संशोधनाच्या सामान्य विषयक्षेत्राचे विशिष्ट संशोधन समस्येत रुपांतर करणे म्हणजे समस्यासूत्रण होय. संशोधन समस्या संशोधनकर्त्यास जाणवणारी एक सैध्दांतिक किंवा व्यावहारिक अडचण होय. साधारणतः समस्यासूत्रणात काही मूलभूत प्रश्नांचा विचार करणे आवश्यक असते. जसे कशाचा अभ्यास करावयाचा आहे ? अभ्यासाचे क्षेत्र कोणते ? आदी बाबीचा अभ्यास करणे यामध्ये अपेक्षित असते. भारत व महाराष्ट्रातील लसमकालीन स्थितीचा विचार करता शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या, स्त्रियांवरील बलात्कार व अन्य घटनात होणारी वाढ, ढासळती कायदा व सुव्यवस्था, शिक्षण व्यवस्थेचे खाजगीकरण, हिंदू-मूस्लिम द्वेषाच्या वातावरणात होणारी वाढ तसेच सामाजिक, जातीय भेदभाव इत्यादी समस्या या देशाला ह्रासाकडे घेऊन जाणाऱ्या आहेत. त्यामुळे या परिस्थितीतून पुन्हा एकदा बाहेर पडण्यासाठी पुरोगामी अशा फुले, शाहू आणि आंबेडकर विचारधारेची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठीच “महात्मा ज्योतिबा फुले यांचे इतिहास लेखनातील योगदान : एक अभ्यास” हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व

एक मूलगामी विचारवंत म्हणून महात्मा फुले यांनी ब्राह्मणांचे कसब, शेतकऱ्याचा असूड, गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म, अखंडादी काव्य रचना, दुष्काळविषयक पत्रक, तृतीय रत्न, छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा असे ऐतिहासिक लिखान केले. त्याबरोबर बहुजन समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्या काळामध्ये वृत्तपत्र लिखाणदेखील केले. क्रांतिकारी व सुधारणावादी लेखक या नात्याने महात्मा फुले यांनी समग्र वाड्.मय लिहिले आहे. त्यांच्या शेतकऱ्यांचा असूड, गुलामगिरी या ग्रंथांतून सामाजिक स्थिती व त्यातून बाहेर पडण्यासाठीचा मार्ग याचे समग्र चित्रण त्यांनी केले. त्यांच्या लिखानामुळे तत्कालीन निद्रिस्त उपेक्षित समाजाला जागृत करून त्या समाजामध्ये शोषणाविरूद्ध बंड करण्याची ताकत निर्माण करण्याची क्षमता निर्माण केली. त्यामुळेच त्यांच्या ऐतिहासिक लिखानामुळे समाजात क्रांति होऊ शकली हे निर्विवाद सत्य आहे. एकंदरीत महात्मा फुले यांचे इतिहास लेखनातील मोठे योगदान असल्यामुळे ते येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शक ठरू शकते. त्यामुळे इतिहास लेखनातील महात्मा फुलेच्या महत्त्व जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याच दृष्टिकोनातून महात्मा ज्योतिबा फुले यांचे इतिहास लेखनातील योगदान : एक अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१. महात्मा फुलेंच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.

२. महात्मा फुलेंच्या जडणघडणीचा अभ्यास करणे.

३. महात्मा फुलेंचे इतिहास लेखनातील योगदानाचा अभ्यास करणे.

४. इतिहास लेखनाची समकालीन परिस्थितीमध्ये प्रस्तुतता तपासणे.

५. समाजोपयोगी शिफारशीचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहीतके

१. महात्मा फुलेंची कौटुंबिक पार्श्वभूमी सर्वसामान्य होती.

२. महात्मा फुलेंच्या जडणघडणीत विविध पैलु महत्त्वपूर्ण ठरले आहेत.

३. महात्मा फुलेंचे इतिहास लेखनातील मोठे योगदान लाभले आहे.

४. महात्मा फुलेंच्या इतिहास लेखनाची समकालीन परिस्थितीमध्ये अत्यंत आवश्यकता आहे.

५. महात्मा फुलेंच्या इतिहास लेखनातील दखल घ्यावी अशा महत्त्वपूर्ण शिफारशी आहेत.

संशोधन पद्धती

संशोधन हा इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा पर्यायी शब्द आहे. इंग्रजी शब्दकोशामध्ये ''संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे यांचे पुन:पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय.'' प्रत्येक अध्ययन विषयात ज्या संकल्पना, सिद्धांत, निष्कर्ष स्वीकृत झालेले आहेत. त्यांचे प्रामाण्य पुन:पुन्हा तपासून पाहणे हे त्या अध्ययन विषयांच्या अभ्यासकांचे कार्य आहे. जे सिद्धांत विभिन्न शास्त्रात प्रस्थापित झालेले आहेत. त्याची विश्वासार्हता तपासून पाहणे हे संशोधकाचे कार्य आहे. संशोधनामुळे मान्य झालेल्या नवीन तथ्यांच्या आधारावर प्रस्थापित ठरलेल्या सिद्धांतांत काही बदल करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली, तर अशा सिद्धांताची नव्याने मांडणी करण्यासाठी संशोधनाची गरज पडते.

संशोधनाचे प्रामुख्याने व्यवहारिक संशोधन, क्रियात्मक संशोधन, उपयोजित संशोधन आणि मूलभूत सशोधन असे चार प्रकार पडतात. व्यहारिक संशोधनातून जे निष्कर्ष समोर येतात त्यांचा उपयोग समाजाचे कल्याण करण्यासाठी होत असतो. हे संशोधन प्रामुख्याने सामाजिक जीवनाच्या व्यवहाराशी संबधित असते. क्रियात्मक संशोधन आणि व्यावहारिक संशोधन हे परस्पराशी पूरक आहे. क्रियात्मक संशोधनाचा मुख्य उद्देश वर्तमान परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचा असतो. उदा.वांशिक तणाव, गलिच्छ वस्ती सुधार, पूर्वग्रह किंवा प्रशासकीय व्यवस्थेतील परिवर्तन, स्त्रीवादांच्या समस्या यांच्याशी संबंधित असते. तर मूलभूत संशोधनात एखादी घटना, विचार किंवा समाजात उद्‌भवलेल्या समस्याचे कारण शोधले जाते. या संशोधनात समस्येचे निदान करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपाय योजना केल्या जात नाहीत. मूलभूत संशोधन हे अमूर्त किंवा चल घटकांशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यामध्ये स्थलकालपरत्वे बदल होत असतात. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाचा विषय व्यष्टी (Case) किंवा मूलभूत अध्ययनाशी संबंधित असल्यामुळे ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक या संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन पद्धती

तथ्य संकलनाचे स्त्रोत

- **प्राथमिक तथ्य संकलन**
  - प्रत्यक्ष निरीक्षण
  - प्रश्नावली
  - मुलाखती
  - अनुसूची
  - विशिष्टाभ्यास
- **द्वितीय तथ्य संकलन**
  - **अ.व्यक्तीगत कागदपत्रे**
    - आत्मचरित्रे
    - रोजनिशी
    - पत्रे
    - संस्मरण
  - **ब.सार्वजनिक कागदपत्रे**
    - शासकीय अहवाल/प्रकाशने
    - खाजगीसंस्थाचे अहवाल/प्रकाशने
    - वर्तमानपत्रे/मासिके/पुस्तके
    - ऐतिहासिक कागदपत्रे

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी द्वितीय स्त्रोताचा अवलंब करण्यात येईल. द्वितीय स्त्रोतांमध्ये प्रकाशित ग्रंथ, अनुवादीत ग्रंथ साहित्य, शासकीय व खाजगी संस्थाचे अहवाल, वर्तमानपत्रे, शोधप्रबंध, नियतकालीके, मासिके, त्रैमासिके, इंटरनेट इत्यादी दुय्यम साधनाचा उपयोग करण्यात येईल.

संशोधनाची मर्यादा

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधन सुरू होण्यापूर्वी संशोधनाची निश्चित मर्यादा ठरविणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे अवकाशात विमानाला निश्चित दिशा दाखविण्याचे काम होकायंत्र करीत असते त्याचप्रमाणे संशोधनाला निश्चित आकार प्राप्त होण्यासाठी संशोधनाला मर्यादा असणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र हे महात्मा फुले यांचे इतिहास लेखनातील योगदान असून ही या संशोधनाची मर्यादा आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये इतर ही संदर्भ येऊ शकतात.

संशोधनाचा आराखडा

प्रकरण पहिले : महात्मा फुलेंची कौटुंबिक पार्श्वभूमी

प्रकरण दुसरे : महात्मा फुलेंची जडणघडण

प्रकरण तिसरे : महात्मा फुलेंचे इतिहास लेखनातील योगदान

प्रकरण चौथे : इतिहास लेखनाची समकालीन परिस्थितीमध्ये प्रस्तुतता

प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भग्रंथ

१. हरि नरके (संपा), युगपूरूष महात्मा फुले चरित्र साधने, प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन मुंबई, प्रथमावृत्ती, १९९३

२. पंढरीनाथ सिताराम पाटील, महात्मा ज्योतिराव फुले, मनोविकास प्रकाशन, पुणे, २००५

३. गं. बा. सरदार, महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार, पुणे, १९८१

४. मोतीराम कटारे, क्रांतिबा फुले चळवळ आणि तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०००

५. धनंजय कीर (संपा), महात्मा ज्योतिराव फुले समग्र वाङ्.मय साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, १९६९

६. डॉ. य. दी. फडके, महात्मा फुले समग्र वाङ्.मय महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१

७. व्ही.बी.पाटील, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथमावृत्ती २०१२

८. ए.एन.भक्कड, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१२

९. रा.ना.घाटोले, सामाजिक संशोधन पध्दती

१०. पी.एल.भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती, हिमालय पब्लिकेशन हाऊस, दिल्ली, प्रथमावृत्ती १९९४

११. गुरुनाथ नाडगोडे, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००१

१२. प्रा.एस.डी.दराडे, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३

१३. प्रदिप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन,

१४. Kothan C.R., Research Methodology, Methods and Techaigues, New Delhi, Age International Publisher.

१५. www.wikipedia.org

संशोधक विद्यार्थी

अविनाश गंगाधर मलदोडे

संशोधन मार्गदर्शक

डॉ. कोंडेकर आर. एस.

प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख
व संशोधन मार्गदर्शक
राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड
ता. मुदखेड जि. नांदेड